Estd. 1962
NAAC'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

**१८/२०२१**

**विषय -** **कार्यालयीन उपस्थितीबाबत**

**संदर्भ-** १. महाराष्ट्र शासन महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुर्नवसन विभाग शासन आदेश क्रमांक डीएमयू/२०२०/सीआर.९२/ डी.एम-१, दिनांक १५ मार्च, २०२१.
२. शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.कोरोना/२६२१/प्र.क्र.३०/मवि- १/५२६९ दि.१६ मार्च, २०२१
३. जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कोल्हापूर यांचे आदेश जा.क्र.नैआ/कोरोना विषाणू/आरआर/८९/२०२१ दि.१६/०३/२०२१
४. विद्यापीठ परिपत्रक जा. क्र. आस्थपना ८८४/ दि.१८ मार्च, २०२१
५. महाराष्ट्र शासन महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुर्नवसन विभाग शासन आदेश क्रमांक डीएमयू/२०२०/सीआर.९२/ डी.एम-१, दिनांक २७ मार्च, २०२१.
६. जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कोल्हापूर यांचे आदेश जा.क्र.नैआ/कोरोना विषाणू/आरआर/९२/२०२१ दि.२७/०३/२०२१

सर्व संबधिताना आदेशान्वये कळविण्यात येते की, कोविड-१९ संसर्गाचा प्रादुर्भाव वाढत असलेने कोविड- १९ विषाणूचा फैलाव रोखण्यासाठी आणि तातडीने काही उपाययोजना करण्यासाठी व काही सुचानांचे काटेकोर पालन करण्यासाठी उपरोक्त सदंर्भीय क्र.५ व ६ पत्राअन्वये निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार सदर आदेशामध्ये दिलेल्या सुचनाच्या अनुषंगाने विद्यापीठातील अधिविभाग यांच्या शैक्षणिक व प्रशासकीय तसेच प्रशासकीय विभाग यांच्या प्रशासकीय कामकाजाकरिता खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

१. उपरोक्त संदर्भीय क्र. ६ मधील सुचनेनुसार अत्यावश्यक सेवा प्रदान करणारी विभाग आवश्यकतेनुसार पूर्ण क्षमतेने सुरू राहतील. इतर प्रत्येक अधिविभाग / प्रशासकीय विभागातील विभाग प्रमुख यांनी अधिविभाग / विभागातील शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवकांच्या उपस्थितीबाबत कोविड-१९ प्रादुर्भाव व्यवस्थापनाच्या अनुषंगाने योग्यतो निर्णय घ्यावा. व त्याचा अहवाल आस्थापना विभागास सादर करण्यात यावा.

२. विद्यापीठ कार्यालयातील गर्दी कमी करण्यासाठी अभ्यागतांना तातडीच्या कामाशिवाय कार्यालयामध्ये प्रवेश करणेस परवानगी असणार नाही. ज्या अभ्यागतांना बैठकीसाठी बोलविण्यात आलेले आहे. त्यांच्या बाबतीत विभाग/कार्यालय प्रमुख यांनी संबधित अभ्यागतांना विशेष पास निर्गमित करण्यात यावेत

३. सुरक्षा विभागामार्फत पुढील दक्षता घेण्यात यावी. **अ)** मास्क परिधान केल्याशिवाय कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. (No Mask- No Entry), **ब)** कार्यालयात येणाऱ्या प्रत्येकाचे तापमान तपासण्यात यावे, **क)** ताप असलेल्या व्यक्तींना कार्यालयात प्रवेश दिला जाणार नाही, **ड)** प्रवेशव्दार मध्ये पुरेशा प्रमाणात हॅंड सॅनिटायझर ठेवणेत यावीत.

४. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक:समय २०२०/प्र.क्र.३५/१८(र.स.का.), दि.११ जून, २०२० अन्वये ज्या कार्यालयातील उपस्थिती रोटेशनने नियंत्रित करण्यात आलेली आहे. अशा कार्यालयातील लॉकडाऊनच्या कालावधीत दिव्यांग शिक्षक/अधिकारी/सेवकांना कार्यालयात उपस्थित राहण्यापासून सूट अनुज्ञेय असेल. संबधित शिक्षक/अधिकारी/सेवकांनी कार्यालयातील त्यांचेकडील महत्वाच्या व तातडीच्या कामकाजाचा निपटारा होणेसाठी मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी विभागास उपलब्ध करून दयावेत. तसेच अशा प्रकारे विभागात अनुपस्थित असणाऱ्या शिक्षक व अधिकारी/सेवकांचा अनुपस्थितीचा अहवाल पी. जी. आस्थापना / आस्थापना - १ विभागाकडे विभागप्रमुख मार्फत सादर करण्यात यावा.

५. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक:समय २०२०/प्र.क्र.४१/१८(र.स.का.), दि.२३ जूलै, २०२० अन्वये ज्या कार्यालयातील उपस्थिती रोटेशनने नियंत्रित करण्यात आलेली आहे. अशा कार्यालयातील गर्भवती महिला तसेच अवयव प्रत्यारोपण केलेले, थेरपी, इम्युनोसप्रेसिव्ह थेरपी घेत असलेले शिक्षक व अधिकारी /सेवक हे कार्यालयात उपस्थित राहण्यापासून सूट मिळण्यास पात्र असतील. त्यासाठी त्यांनी वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. संबधित शिक्षक/अधिकारी/सेवकांनी कार्यालयातील त्यांचेकडील महत्वाच्या व तातडीच्या कामकाजाचा निपटारा होणेसाठी मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी विभागास उपलब्ध करून दयावेत.

६. सदरचे आदेश दि.३० एप्रिल,२०२१ पर्यंत लागू राहतील.

तसेच वेळोवेळी संदर्भ क्र. ६ मधील लागू असलेल्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करावे.

**(डॉ. विलास द. नांदवडेकर )**
कुलसचिव

**जा.क्र. आस्थापना/** 984
**दि.** 1 APR 2021
**प्रति,**

१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, व सेवक
२) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.
३) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
- यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर
स्वराज्य भवन, नागाळा पार्क, कोल्हापूर - ४१६००२
दुरध्वनी क्रमांक : 0231-2659232 टोल फ्री (1077)
Email: rainkolhapur@gmail.com

जा.क्र. नैआ/कोरोना विषाणू/आरआर/९२/२०२१. दिनांक :- २७/०३/२०२१

वाचले :-

१. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७.
२. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५,
३. फौजदारी प्रकिया संहिता, १९७३ चे कलम १४४.
४. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील क्रमांक करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५, दिनांक १३/०३/२०२०, १४/०३/२०२० तसेच १५/०३/२०२० रोजीच्या अधिसुचना.
५. महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना No.DMU/२०२०/CR.९२/DisM-१, दिनांक २३ व २४ मार्च २०२०.
६. इकडील कार्यालयाकडील जा.क्र. नैआ/कोरोना विषाणू/आरआर/३५/२०२१. दि. १९/०२/२०२१ रोजीचा आदेश.
७. इकडील कार्यालयाकडील जा.क्र. नैआ/कोरोना विषाणू/आरआर/५०/२०२१. दि. २८/०२/२०२१ रोजीचा आदेश.
८. इकडील कार्यालयाकडील जा.क्र. नैआ/कोरोना विषाणू/आरआर/८९/२०२१, दि. १६/०३/२०२१ रोजीचा आदेश.
९. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No. DMU /२०२०/CR.९२/DisM-१, दिनांक २७/०३/२०२१ रोजीचे आदेश.

---

**विषय :- कोराना विषाणू (कोविड-१९) प्रादुर्भाव नियंत्रणासाठी व उपाययोजनाबाबत दिशानिर्देश.**

## -: आदेश :-

ज्याअर्थी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र दिनांक १४ मार्च २०२० अन्वये कोरोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ मधील तरतूदींच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. त्याच प्रमाणे आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील तरतुदी प्रमाणे जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकारण हे कोणतीही आपत्ती रोखण्यासाठी किंवा आपत्तीविरुध्द प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी सक्षम प्राधिकारी आहेत.

ज्याअर्थी, मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No. DMU/२०२०/CR.९२/DisM-१, दिनांक २९/०६/२०२० रोजीच्या आदेशामध्ये त्या त्या जिल्ह्यातील परिस्थिती प्रमाणे संबंधीत जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांना जिल्ह्यातील रुग्ण स्थितीनुसार आदेश काढणेबाबत सर्वाधिकार देणेत आलेले आहेत.

ज्याअर्थी, कोविड-१९ विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढत असल्याने आपत्कालीन उपाय योजनेचा भाग म्हणून मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, यांनी संपूर्ण महाराष्ट्र राज्याचे क्षेत्रात लॉकडाऊनची घोषणा केलेली असून त्याबाबत मिशन बिगिन अगेन अंतर्गत उपरोक्त वाचले क्र. ९ अन्वये आदेश निर्गमीत केलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, वाचले क्र. ९ च्या आदेशान्वये राज्यात कोविड-१९ संसर्गाचा प्रादुर्भाव वाढत असलेने कोविड-१९ विषाणूचा फैलाव रोखण्यासाठी आणि तातडीने काही उपाययोजना करण्यासाठी काही सूचनांचे काटेकोर पालन करणेबाबत निर्देशित केले आहे.

त्याअर्थी राज्य शासनाकडील वाचले क्र. ९ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार **कोल्हापूर जिल्ह्यातील लॉकडाऊनची मुदत दिनांक १५/०४/२०२१ रोजी रात्री १२.०० वा. पर्यंत वाढविणेत येत आहे.** तसेच वाचले क्र. ६ ते ८ मध्ये नमुद केलेली प्रतिबंधित / बंद क्षेत्रे व सुट / वगळणेत आलेली क्षेत्रे कायम ठेवणेत येत आहेत.

त्याअर्थी, कोल्हापूर जिल्ह्यात लॉकडाऊनच्या मुदतीत कोविड-१९ संसर्गाचा वाढता प्रादुर्भाव रोखणेसाठी खालील प्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत :-

अ) कोविड -१९ संसर्ग प्रतिबंधात्मक उपाययोजना.

1) मुखपट्टी / मास्कचा वापर – सर्व नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी, कामाच्या ठिकाणी त्याच प्रमाणे सार्वजनिक व खाजगी वाहनातून प्रवास करताना मुखपट्टी / मास्क वापरणे बंधनकारक असेल.

२/...

Scanned by CamScanner

2) सामाजिक अंतर राखणे – नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी वावरताना दोन व्यक्तींमध्ये किमान ६ फूटाचे अंतर राखणे बंधनकारक असेल. व्यापारी आस्थापनांमध्ये येणाऱ्या ग्राहकांमध्ये सामाजिक अंतर राखले जाईल याची दक्षता घेणे बंधनकारक असेल आणि अशा आस्थापनांमध्ये एका वेळी पाच पेक्षा जास्ती ग्राहक / व्यक्ती असणार नाहीत.
3) सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यास प्रतिबंध – सार्वजनिक ठिकाणी थुंकणाऱ्या व्यक्ती विरुध्द त्या त्या संबंधीत प्राधिकरणाने कायदे व नियम याद्वारे निश्चित केलेल्या दंडाची आकारणी करणेत यावी.
4) सार्वजनिक ठिकाणी दारु, पान, गुटखा, तंबाखू, सुपारी इ. खाण्यास / पिण्यास प्रतिबंध करणेत येत आहे.
5) घरातून काम करणे खाजगी / शासकिय / निमशासकीय कार्यालये त्याचप्रमाणे व्यापारी / औद्योगिक आस्थापनामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी आवश्यकते प्रमाणे घरुन काम करणेची मुभा देणेत यावी. कार्यालये, कामाची ठिकाणे, दुकाने, बाजार तसेच औद्योगिक आस्थापनांच्या कामाच्या वेळांमध्ये अशा ठिकाणी काम करणाऱ्या लोकांची गर्दी होणार नाही अशा पध्दतीने विभागणी करावी.
6) सर्व आस्थापनांमध्ये येणारे कर्मचारी / ग्राहक यांचेसाठी शरिराचे तपमान तपासणे, हात धूणे आणि सॅनिटायझरची सुविधा सर्व प्रवेश, बहिंगमन दारात व सामुदायीक जागांच्या ठिकाणी ठेवावी.
7) सर्व आस्थापनांमधील कामाची जागा, सामुदाईक वापराची ठिकाणे त्याच प्रमाणे व्यक्तींचा एकमेकांशी संपर्क येईल अशी ठिकाणे वारंवार निर्जंतुक करणेत यावीत.
8) सर्व प्रकारच्या आस्थापनांमधील व्यवस्थापन तिथे काम करणाऱ्या कामगारांमध्ये सामाजिक अंतर राखले जाईल, दोन कामाच्या पाळयांमध्ये अंतर असेल व कर्मच्याऱ्यांच्या जेवणाच्या वेळा भिन्न असतील याची दक्षता घेतील.

**प्रतिबंधात्मक उपाय योजना -**

१) कंटेन्टमेंट झोन – प्रतिबंधीत क्षेत्रे.

i) स्थानिक प्रशासनाने घोषित केलेली प्रतिबंधीत क्षेत्रे पुढील आदेशा पर्यंत कायम राहतील.

ii) केंद्र शासन व राज्य शासनाने वेळोवेळी कंटेन्टमेंट झोन तयार करणेविषयी दिलेल्या सर्व सुचना या पुढील आदेशापर्यंत कायम राहतील.

iii) प्रतिबंधीत क्षेत्रामध्ये सकारात्मक चाचणी आलेल्या सर्व व्यक्तींच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींची यादी तयार करणे, त्यांचा मागोवा घेणे, त्यांची ओळख पटवणे, त्यांचे अलगिकरण करणे आणि त्यांचा १४ दिवसांपर्यंत पाठपूरावा करणे. (सकारात्मक व्यक्तीच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींपैकी ८०% व्यक्तींना ७२ तासांमध्ये शोधून काढणे.)

२) कोल्हापूर जिल्ह्यात दिनांक २७/०३/२०२१ मध्यरात्रीपासून लागू असणाऱ्या प्रतिबंध आदेशाने सायंकाळी ०८.०० वा. ते सकाळी ०७.०० वा. पर्यंत ५ पेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येणेस मज्जाव असेल. याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती रक्कम रु. १०००/- (प्रती व्यक्ती) दंडास पात्र राहतील.
३) कोल्हापूर जिल्ह्यात दिनांक २७/०३/२०२१ मध्यरात्रीपासून लागू असणाऱ्या प्रतिबंध आदेशाने सायंकाळी ०८.०० वा. ते सकाळी ०७.०० वा. पर्यंत सर्व सार्वजनिक ठिकाणे (बगिचे) बंद राहतील. याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती रक्कम रु. १०००/- (प्रती व्यक्ती) दंडास पात्र राहतील.
४) कोणतीही व्यक्ती मास्क परिधान न केलेली आढळल्यास रक्कम रु. ५००/- दंडास पात्र राहील. सार्वजनिक ठिकाणी कोणतीही व्यक्ती थुंकताना आढळल्यास रक्कम रु. १०००/- दंडास पात्र राहील.
५) कोल्हापूर जिल्ह्यात दिनांक २७/०३/२०२१ मध्यरात्रीपासून लागू असणाऱ्या प्रतिबंध आदेशाने सायंकाळी ०८.०० वा. ते सकाळी ०७.०० वा. पर्यंत सर्व सिनेमा हॉल (सिंगल स्क्रिन व मल्टीप्लेक्सेस) मॉल्स, सभागृहे आणि रेस्टॉरंटस् बंद राहतील. तथापी सदर कालावधीत रेस्टॉरंट मधून होम डिलीव्हरी व पार्सल सुविधा देणेस परवानगी असेल.
६) 'NO Mask – No Entry' / 'मास्क नाही प्रवेश नाही' हा फलक सर्व खाजगी / शासकीय, निमशासकीय कार्यालये, उद्योग, दुकाने, बाजार इ. ठिकाणी लावणे व त्याचे पालन करणे अशा आस्थापना / कार्यालयांचे प्रमुखांवर बंधन कारक असेल. ज्या आस्थापना / कार्यालये सदर अटीचे उल्लंघन करतील त्या आस्थापनांचे / कार्यालयांचे प्रमुख वैयक्तीकरित्या त्याच प्रमाणे अशा आस्थापना / कार्यालये संस्था म्हणून एकावेळी रक्कम रु. १०००/- दंडास पात्र राहतील.

सदर आदेशाचा भंग केल्यास तसेच यापूर्वीच्या आदेशातील अटी शर्तीचा भंग केल्यास, संबंधित सिनेमागृहे

३/...

Scanned by CamScanner

(सिंगल स्क्रिन आणि मल्टिप्लेक्सेस), हॉटेल्स / रेस्ट्रॉरंटस ही कोव्हीड -१९ विषाणु संसर्ग केंद्र सरकारने आपत्ती म्हणून अधिसूचित केले असे तोपर्यंत बंद राहतील. तसेच संबंधित आस्थापना मालक हे आपत्ती व्यवस्थापन कायद्या अंतर्गत दंड वसूल करणेस पात्र राहतील.

७) कोणतेही सामाजिक / सांस्कृतिक / राजकीय / धार्मिक कार्यक्रम, सभा, मोर्चे, मिरवणूका, संमेलने तसेच यात्रा, उत्सव, उरुस इ.चे आयोजन करणेस परवानगी असणार नाही. सभागृहे व नाटयगृहे देखील सदर कार्यक्रम / मेळावे / सभा यांचे आयोजन करणेस वापरु नयेत. सदर आदेशाचा भंग केल्यास, संबंधित कार्यक्रमाचे आयोजक/ जागा मालक हे आपत्ती व्यवस्थापन कायद्या अंतर्गत दंड वसूल करणेस तसेच फौजदारी कारवाईस पात्र राहतील. तसेच संबंधित सभागृहे / इतर ठिकाणे ही कोव्हीड -१९ विषाणु संसर्ग केंद्र सरकारने आपत्ती म्हणून अधिसूचित केले असे तोपर्यंत बंद केली जातील.

८) विवाह समारंभ कार्यक्रमास फक्त ५० नागरिकांना उपस्थित राहणेस परवानगी असेल. सदर आदेशाचा भंग केल्यास, संबंधित कार्यक्रमाचे ठिकाण / हॉल मालक हे आपत्ती व्यवस्थापन कायद्या अंतर्गत दंड वसूल करणेस पात्र राहतील. तसेच संबंधित ठिकाणे / हॉल ही कोव्हीड -१९ विषाणु संसर्ग केंद्र सरकारने आपत्ती म्हणून अधिसूचित केले असे तोपर्यंत बंद केली जातील.

९) अंतविधी / अंत्ययात्रा इत्यादी कार्यक्रमामध्ये सहभागी होणेस फक्त २० नागरिकांना परवानगी असेल. स्थानिक प्राधिकरण यांनी या अटीचे पालन केले जात असलेबाबत खात्री करणे.

१०) गृह अलगीकरणास खालील प्रतिबंधास अधिन राहून परवानगी असेल.

I) गृह अलगिकरण झालेल्या नागरिक / रुग्णांविषयीची माहिती संबंधित स्थानिक प्राधिकरण यांना कळविणे. तसेच तसेच गृह अलगीकरण व्यक्ती ही कोणत्याही वैद्यकीय व्यावसायिकाच्या (डॉक्टर ) यांचे देखरेखीखाली आहे याची देखील माहिती स्थानिक प्रशासनास देणे बंधनकारक असेल.

II) कोव्हीड -१९ रुग्ण असलेल्या ठिकाणी सुरवातीच्या दिवसापासून १४ दिवसापर्यंत दर्शनी ठिकाणी फलक लावावा लागेल, जेणेकरून त्या ठिकाणी कोव्हीड -१९ रुग्ण असलेची माहिती नागरिकांना होईल.

III) कोव्हीड -१९ + Ve रुग्णांच्या हातावर गृह अलगीकरण (Home Quarantine) असा शिक्का मारणे.

IV) सदर कोव्हीड -१९ रुग्ण गृह अलगीकरण केलेल्या ठिकाणी संबंधित कुटुंबातील व्यक्तीनीही कमीत कमी संपर्क ठेवावा. तसेच मास्क परिधान केलेशिवाय सदर ठिकाणी प्रवेश केला जाणार नाही, याविषयी दक्षता घेणेत यावी.

V) गृह अलगीकरणाची कोणत्याही प्रकारचे उल्लंघन झालेस सदर कोव्हीड -१९ रुग्ण किंवा अलगीकरण झालेले नागरिक यांना स्थानिक प्रशासनाने सुरु केलेल्या कोव्हीड केअर सेंटरमध्ये (CCC) मध्ये स्थंलातरीत केले जाईल.

११) सर्व खाजगी कार्यालये / आस्थापना (आरोग्य व इतर अत्यावश्यक असलेल्या आस्थापना वगळता) ही ५० % क्षमतेच्या अधिन राहून सुरू राहतील. सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांच्या कार्यालय प्रमुखाने कर्मचारी उपस्थितीबाबत कोविड-१९ प्रादुर्भाव व्यवस्थापनाच्या अनुषंगाने योग्यतो निर्णय घ्यावा. सर्व उत्पादन करणाऱ्या आस्थापना पूर्ण क्षमतेने कार्यरत राहतील. परंतू अशा आस्थापनांनी प्रत्यक्ष उत्पादनात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये सामाजिक अंतर राखले जाण्यासाठी आवश्यकते प्रमाणे कर्मचाऱ्यांची उपस्थिती कमी ठेवणेबाबत सुचित करणेत येत आहे. वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या घटकातील कर्मचाऱ्यांमध्ये सामाजिक अंतर राखणेसाठी स्थानिक प्राधिकरणाने मान्यता दिल्या प्रमाणे अशा घटकांना कामांच्या पाळ्या वाढविण्याची मुभा असेल. अशी उत्पादन क्षेत्रे खालील बंधनांचे पालन करुन सुरु राहतील.

I) मास्क परिधान केल्याशिवाय कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही . (NO Mask — No Entry)

II) सर्व ठिकाणी तापमापीचा उपयोग करून शरीराच्या तापमानाची नोंद घेणेत यावी, जेणेकरून ताप असलेल्या कोणत्याही व्यक्तीला प्रवेश दिला जाणार नाही.

III) प्रवेशव्दार तसेच इतर ठिकाणी पुरेशा प्रमाणात हँड सॅनिटायझर ठेवणेत यावीत.

IV) सर्व आस्थापनांच्या मध्ये पुरेशा प्रमाणात मनुष्यबळ नियुक्त करावे, जेणेकरून सर्व अभ्यांगताबाबत मास्क परिधान केला जाईल, सामाजिक अंतर राखले जाईल याविषयी तपासणी केली जाईल.

V) या आदेशाचा उल्लंघन करणारे संबंधीत घटक हे आपत्ती व्यवस्थापन कायद्या अंतर्गत दंड वसूल करणेस तसेच फौजदारी कारवाईस पात्र राहतील. तसेच संबंधित आस्थापना ही कोव्हीड -१९ विषाणु संसर्ग केंद्र सरकारने आपत्ती म्हणून अधिसूचित केले असे तोपर्यंत बंद केली जातील.

४/...

Scanned by CamScanner

१२) शासकीय कार्यालयामध्ये गर्दी कमी करण्यासाठी, निवडून आलेले लोकप्रतिनीधी वगळून इतर अभ्यागतांना तातडीच्या कामाशिवाय शासकीय कार्यालयामध्ये प्रवेश करणेस परवानगी असणार नाही. ज्या अभ्यागतांना बैठकीसाठी बोलविण्यात आलेले आहे त्यांच्या बाबतीत विभाग / कार्यालय प्रमुख यांनी विशेष पास निर्गमीत करणेत यावेत.

१३) सर्व धार्मिक ठिकाणच्या व्यवस्थापन करणाऱ्या विश्वस्त यांनी संबंधित धार्मिक ठिकाणच्या परिसरामध्ये उपलब्ध असणारी जागा आणि पुरेसे सामाजिक अंतर राखले जाणेच्या दृष्टीकोनातून दर तासाला किती अभ्यांगताना प्रवेश देणेत येईल या संख्येची निश्चिती करून प्रसिध्द करणे. भाविक तसेच अभ्यागंतासाठी ऑनलाईन आरक्षण किंवा इतर सोयीच्या पध्दतींचा वापर करणे. वरील ठिकाणी फक्त खालील प्रतिबंधास अनुसरून प्रवेश दिली जाईल याबाबत दक्षता घेणे.

I) मास्क परिधान केल्याशिवाय कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही . (NO Mask – No Entry)

II) सर्व ठिकाणी तापमापीचा उपयोग करून शरीराच्या तापमानाची नोंद घेणेत यावी, जेणेकरून ताप असलेल्या कोणत्याही व्यक्तीला प्रवेश दिला जाणार नाही.

III) प्रवेशव्दार तसेच इतर ठिकाणी पुरेशा प्रमाणात हँड सॅनिटायझर ठेवणेत यावीत.

IV) सर्व आस्थापनांच्या मध्ये पुरेशा प्रमाणात मनुष्यबळ नियुक्त करावे, जेणेकरून सर्व अभ्यांगताबाबत मास्क परिधान केला जाईल, सामाजिक अंतर राखले जाईल याविषयी तपासणी केली जाईल.

१४) ठराविक निर्बंधासह सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुरु करणेत आलेली आहे. याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती, संबंधीत सार्वजनिक परिवहन प्राधिकरणाद्वारे रक्कम रु. ५००/- दंडास पात्र राहतील.

१५) यापूर्वी वेळोवेळी परवानगी दिलेल्या व प्रतिबंधित केलेल्या बाबी / क्षेत्रे कायम राहतील आणि यापूर्वी दिलेले आदेश सदर आदेशास संलग्न राहतील आणि सदरचे आदेश दिनांक ३०/०४/२०२१ पर्यंत अस्तित्वात राहतील.

१६) RTPCR चाचण्यांचे प्रमाण विशेष प्रयत्न करुन ७०% किंवा त्यापेक्षा अधिक प्रमाणात वाढवण्यात यावेत.

१७) कोविड-१९ सकारात्मक व्यक्तींचे संपर्क शोधणे – सकारात्मक चाचणी आलेल्या व्यक्तींचे लवकरात लवकर अलगीकरण करणे, त्याचे संपर्क शोधून काढून त्यांचे अलगीकरण करणे, बंधनकारक असेल. अशा संपर्कातील व्यक्ती किंवा कोविड-१९ बाधीत रुग्णास गृह अलगिकरणासाठी स्वतंत्र व्यवस्था नसल्यास संस्थात्मक अलगीकरणात राहणे बंधनकारक करणेत येत आहे.

१८) विहीत केलेल्या प्रतिबंधात्मक उपाय योजना, चाचण्या आणि रुग्ण संपर्क शोधणे याची तंतोतंतअंमल बजावणी करणेची जबाबदारी संबंधीत स्थानिक प्रशासन, पोलीस प्रशासन आणि महानगरपालिका, नगरपालिका प्रशासनाची असेल.

उपरोक्त आदेशाचे पालन न करणाऱ्या कोणतीही व्यक्ती अथवा सस्थेवर भारतीय दंड संहीता १८६० (४५) याच्या कलम १८८, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ व साथ रोग नियंत्रण कायद्यातील तरतुदी प्रमाणे फौजदारी कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**(दौलत देसाई)**
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कोल्हापूर**

प्रति :- सर्व नागरिक व आस्थापना कोल्हापूर जिल्हा.

प्रत :- १. आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर
३. पोलीस अधीक्षक, कोल्हापूर
४. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर
५. प्रादेशिक परिवहन अधिकारी, कोल्हापूर
६. सहा. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, कोल्हापूर
७. विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, कोल्हापूर



Scanned by CamScanner

८. प्रादेशिक अधिकारी, म.औ.वि. महामंडळ, कोल्हापूर
९. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर
१०. उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)
११. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी (सर्व)
१२. मुख्याधिकारी (सर्व) नगरपालिका / नगरपरीषद / नगरपंचायत.
१३. सर्व ग्रामपंचायती.
१४. जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर यांचेकडे उपरोक्त् आदेश जनतेच्या माहितीसाठी कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व दैनिक/दृकश्राव्य माध्यमातून ठळक बातमी स्वरुपात प्रसिध्द करुन, प्रसिध्दी अहवाल इकडे द्यावा.
१५. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, येरवडा कारागृह, पुणे यांचेकडे महाराष्ट्र राजपत्रामध्ये प्रसिध्दीसाठी व त्याच्या प्रती पुरविणेसाठी रवाना.

Scanned by CamScanner